# सदाफुली

नोव्हेंबर २०१४, अंक तिसरा, वर्ष पहिले

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

सप्रेम नमस्कार! 'सदाफुली' चा हा तिसरा अंक तुमच्या हाती देत आहोत. समाजात मुलींचं घटत चाललेलं प्रमाण या प्रश्नाला हे त्रैमासिक छेद देत आहे. यासाठी अर्थातच 'गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तंत्र सुधारित कायदा २००३' आणि वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ या कायद्यांचा उहापोहही 'सदाफुली' च्या अंकांतून केला जात आहे.

मागील अंकात आपण पीसीपीएनडीटी कायद्यातील काही बाबी समजून घेतल्या. सोनोग्राफी मशीनसाठी असणारी ओळख क्रमांक यंत्रणा तसेच कोर्ट केस ट्रॅकिंग सॉफ्टवेअर याबाबतही जाणून घेतलं.

या अंकात आपण पीसीपीएनडीटी कायद्यानुसार अंमलबजावणी करताना समुचित प्राधिकारी, सल्लागार समिती यांसाठी असणारी आचारसंहिता काय सांगते? या कायद्यांतर्गत गुन्हे कसे दाखल करावेत याबाबत माहिती दिली आहे. गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी सोनोग्राफीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे हे आपण जाणतोच. गर्भलिंग निदानाद्वारे मुलींचे प्रमाण कमी होण्यात वैद्यकीय व्यावसायिकही जबाबदार असल्याचे यातूनच स्पष्ट झाले आहे. अशा वेळी वैद्यकीय व्यावसायिकांना रंगेहात पकडण्यासाठी डिकॉय कसा करावा याबद्दल अंकात मांडणी करण्यात आली आहे. तसेच या अंकाचं विशेष म्हणजे वैद्यकीय गर्भपात कायद्यातील काही बारकावेही मांडण्यात आले आहेत.

'सदाफुली'च्या माध्यमातून आम्ही आपणा सर्वांशी हा एक संवाद साधत आहोत. खऱ्या अर्थाने हा संवाद साधला जावा यासाठी सर्व वाचकांना अंकाबद्दलच्या प्रतिक्रियांसाठी आवाहन करत आहोत. मागील अंकांतील माहितीचा तुम्हाला काय उपयोग होऊ शकेल, कोणते विषय तुम्हाला अधिक आवडले, पुढच्या अंकाबद्दल तुमच्या काय अपेक्षा आहेत याविषयी आम्हाला जरूर कळवा!

तुमच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहतोय...

**डॉ. उध्दव गावंडे**
कार्यकारी संचालक,
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र राज्य, पुणे

## या अंकात...


- कायद्याची अंमलबजावणी करताना पाळावयाची आचारसंहिता
- डिकॉय केस कशी करावी?
- असा करावा पंचनामा!
- गुन्हा दाखल कसा करावा?
- वैद्यकीय गर्भपात कायद्यातील बारकावे : एक दृष्टीक्षेप
- प्रशिक्षणाबद्दल थोडक्यात...



- **प्रकाशक व मुख्य संपादक:**
  **राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र राज्य,**
  आरोग्य भवन, आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११००६
- **लेखन व संपादन :** प्राजक्ता व त्रिशूल तथापि ट्रस्ट, पुणे
- **सहाय्य :** संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष, राज्य कुटूंब कल्याण कार्यालय
- **डिझाईन व मुद्रण :** संस्कृती डिझाईनर्स व प्रिंटर्स, पुणे.



- प्रतिक्रिया व संपर्कासाठी पत्ता :

**तथापि ट्रस्ट,**
रेणुप्रकाश ए, तिसरा मजला, नागनाथ पाराजवळ, ८१७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ०२० २४४३११०६/२४४३००५७. ईमेल : tathapi@gmail.com
वेबसाईट : www.tathapi.org

# कायद्याची अंमलबजावणी करताना पाळावयाची आचारसंहिता

आचारसंहिता म्हणजेच कायद्याची अंमलबजावणी करत असताना नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असते. या नियमांचेच संक्षिप्त नाव 'गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तंत्र, नियम २०१४' असे आहे.

❖ **या अधिनियमानुसार अधिसूचित केलेल्या राज्य, जिल्हा आणि उप जिल्हा या सर्व स्तरांवरील समुचित प्राधिकारी खालील आचारसंहितेचे पालन करतील.**

१. पदाची प्रतिष्ठा आणि सत्यनिष्ठा या मूल्यांचे पालन केले जाईल.

२. अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींचे पालन आणि अंमलबजावणी यामध्ये समतोल राखला जाईल.

३. कायद्याची अंमलबजावणी, दोषीबाबत कोणताही पक्षपात किंवा पूर्वग्रह न बाळगता न्यायसंगत पद्धतीने केली जाईल.

४. लिंग, जात आणि धर्म यावर आधारित टिका किंवा कोणतेही वक्तव्य कटाक्षाने टाळले जाईल, जेणेकरून व्यक्तीच्या पदाच्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये.

५. संबंधित अधिकारी त्याच्या/तिच्या अनुपस्थितीमध्ये प्रशासकीय आदेशाद्वारे कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्याकडे त्याचे / तिचे अधिकार सोपवतील आणि आदेशाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी जतन केली जाईल.

❖ **सल्लागार समिती खालील संहितेचे पालन करावे.**

१. सल्लागार समितीची पुनर्बांधणी, कार्ये आणि इतर सुसंगत विषय सल्लागार समिती नियम, १९९६ नुसार असतील.

२. गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम, १९९४ (१९९४ चे ५७) नुसार तपास यंत्रेणेचा भाग असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सल्लागार समितीमध्ये भाग घेता येणार नाही.

३. सल्लागार समितीमध्ये रिक्त झालेली पदे भरण्याची प्रक्रिया पद किंवा जागा रिक्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत भरणे आवश्यक आहे.

४. हितसंबंध गुंतलेल्या कोणीही व्यक्ती, सभासद किंवा कायदेतज्ञ सल्लागार समितीमध्ये म्हणून भाग घेऊ शकत नाही.

५. केंद्रांच्या नोंदणीचे नूतनीकरण, नोंदणी रद्दबातल करणे आणि निलंबन संबंधातील निर्णयांचा निपटारा करण्यासाठी सल्लागार समितीच्या बैठका वारंवार घेणे आवश्यक आहे.

❖ **तक्रार निवारण आणि तपास करण्यासाठी खालील नियमांचे पालन करावे.**

१. सर्व तक्रारी नोंदविण्यासाठी नोंद वही (डायरी) ठेवली जाईल.

२. सर्व तक्रारींची पाहणी करून पुढील कारवाईसंबंधी पारदर्शकता ठेवली जाईल.

३. तक्रार दाखल झाल्यापासून २४ तासात तक्रारींचे तपास सुरु करणे आणि ४८ तासात तपास पूर्ण होणे आवश्यक आहे.

४. शक्यतोवर या तपासामध्ये पोलिसांना सामील केले जाणार नाही, कारण या कायद्यांतर्गत होणाऱ्या तक्रारी दंडविधान, १९७३ (१९७४ चे २) अनुसार हाताळल्या जातील.

❖ **नोंदणी आणि नुतनीकरणासाठी खालील नियमांचे पालन करावे.**

१. नवीन नोंदणी आणि नुतनीकरणासाठी अर्ज मिळाल्यापासून ७० दिवसांच्या आत निपटारा केला जाईल.

२. नोंदणी आणि नुतनीकरणासाठी आलेल्या अर्जदारांवर न्यायालयीन खटला प्रलंबित असतील तर त्यांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

❖ **कायदेशीर कारवाईसंबंधी खालील नियमांचे पालन करावे.**

१. साक्षीदारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक निधी आणि खर्च नोंदणी शुल्कातून दिला जाईल.

२. सर्व सरकारी अधिनियमांचे शासननिर्णय/परिपत्रके न्यायालयात मूळ स्वरुपात प्रस्तुत करावे आणि त्याची एक प्रत जपून ठेवावी.

३. खटला दाखल करताना खटल्याची सर्व कागद पत्रे, लेखी पुरावे, तपशील, साक्षी, पंचनामे आणि खटल्याशी संबंधित इतर सर्व वस्तू मूळ स्वरुपात देणे आवश्यक आहे.

४. सोनोग्राफी मशीनची जप्ती आणि सील करण्याच्या कायदेशीर कारवाई दरम्यान केंद्राचे नोंदणी पत्र रद्द करावे.

५. गर्भधारणा-पूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र नियम, १९९६ च्या तरतुदी लागू करताना, वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१(१९७१ चे ३४) मधील तरतुदींचे उल्लंघन होता कामा नये.

६. निर्दोष सुटकेचा आदेश दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत आणि आदेशाची प्रत मिळाल्यापासून१५ दिवसांच्या आत वरिष्ठ न्यायालयात अपील करणे, पुनर्परीक्षण करणे किंवा

इतर कारवाईसाठी त्वरित पावले उचला.

❖ राज्य सरकारच्या माध्यमातून भारत सरकारला त्रैमासिक अहवाल पाठवले जातील व नोंदणी केलेल्या सर्व केंद्रांची माहिती लगेच प्राप्त व्हावी यासाठी फॉर्म एच (क) मध्ये भरण्यात येईल.

❖ **अल्ट्रासाउंड उपकरणांसाठी खालील नियमांचे पालन करावे.**

१. पोर्टेबल, जुने देऊन नवीन घेतलेली, असेम्बल्ड, भेटवस्तू म्हणून दिलेली, स्क्रॅप किंवा डेमो अल्ट्रासाउंड मशीनची विक्री आणि आयात यावर देखरेख ठेवणे.

२. अल्ट्रासाउंड मशीन निर्माते, डीलर, ठोक आणि किरकोळ विक्रेता तसेच अल्ट्रासाउंड मशीन विक्री संबंधित कोणीही व्यक्ती राज्य स्तरावर नियमित त्रैमासिक अहवाल सादर करतील यावर लक्ष ठेवणे.

३. नोंदणीकृत न केलेली यंत्रे शोधून काढण्यासाठी राज्य किंवा जिल्ह्यामध्ये विक्री केलेली आणि वापरात असलेल्या सर्व यंत्रांचे ठराविक काळाने सर्वेक्षण आणि ऑडीट करणे. सर्व साधारणतः दर सहा महिन्यांनी सर्वेक्षण करावे.

४. नोंदणी न केलेल्या यंत्रांचे मालक आणि विक्रेता यांच्या विरोधात तक्रार दाखल करणे.

❖ **देखरेख आणि निरीक्षणासंबधी खालील नियमांचे पालन करावे.**

१. सर्व नोंदणीकृत केंद्रे व यंत्रांची प्रत्येक ९० दिवसांनी नियमित पाहणी करणे आणि त्या संबधीच्या अहवालाची एक प्रत लेखी पुरावा म्हणून जतन करतील. त्याची एक प्रत केंद्र मालकाला देऊन ती स्वीकारल्याची पोच पावती घेतील.

२. दर तीन महिन्यांनी सर्व पाहणी अहवाल पुढील कारवाईसाठी सल्लागार समिती समोर ठेवले जातील.

३. खटला दाखल केलेल्या घटनांची संख्या, गुन्हा सिद्ध झालेल्या व्यक्ती, नोंदणी केलेली तसेच निलंबित किंवा रद्द केलेली केंद्रे, रद्द किंवा निलंबित केलेले वैद्यकीय परवाने, सोनोग्राफी केंद्राच्या केलेल्या तपासण्या तसेच सल्लागार समितीच्या घेण्यात आलेल्या बैठकांची माहिती, राज्य स्तरावर पाठविलेले अहवाल याबाबत मासिक नोंदी ठेवाव्यात.

(अ) आरोप निश्चिती झाल्यावर सात दिवसाच्या आत आदेशाची प्रत मिळवावी, आरोपी डॉक्टर असेल तर प्रत मिळाल्याच्या सात दिवसाच्या आत निश्चित केलेल्या आरोपांचे तपशील राज्य वैद्यकीय परिषदेला कळवण्यासाठी राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे येथे कळवावे.

(ब) गुन्हा सिद्ध झाला असल्यास त्याची प्रमाणित प्रत लवकरात लवकर मिळवावी. गुन्हा डॉक्टरांवर सिद्ध झाला असल्यास ही प्रमाणित प्रत सात दिवसाच्या आत राज्य वैद्यकीय परिषदेला सादर करण्यासाठी राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे येथे कळवावे.

❖ **उत्तरदायित्वासंबधीचे (Accountability) नियम खालीलप्रमाणे :**


१. कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंबंधी कोणतेही निर्णय घेण्याआधी केंद्र शासनाची पूर्व परवानगी किंवा मान्यता मिळवतील.

२. कायद्याच्या कलम २८, उपकलम १(ब) मधील तरतुदीनुसार नोटीस मिळाल्यास आवश्यक ती कारवाई लगेच करावी. तसे न केल्यास कलम ३१ नुसार मिळणारे संरक्षण लागू होणार नाही व वैयक्तिकरित्या, स्वतःच्या खर्चाने न्यायालयात खटला चालवावा लागेल.

❖ **आर्थिकबाबींसंबंधीचे मार्गदर्शक नियमांचे पालन :**

१. सर्व स्तरांवर संयुक्तपणे दोन अधिकाऱ्यांनी चालवलेले वेगळे व स्वतंत्र बँक खाते काढावे.

२. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि निधीचा विनिमय करताना सरकारी आर्थिक मापदंडाच्या नियमांचे पालन करावे.



## कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांना पकडण्यासाठी

# डिकॉय केस कशी करावी?

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांना सापळा रचून (डिकॉय) पकडताना खालील बाबी लक्षात घेणे गरजेचे ठरते.

१. असा सापळा रचण्याचे काम हे एका गरोदर महिलेला विश्वासात घेऊन करावे लागते. त्यासाठी गर्भलिंग निदान करणे तसेच गर्भ मुलगा की मुलगी याचे निदान करून गर्भपात करणे कायद्याने गुन्हा आहे, हा चिंतेचा सामाजिक प्रश्न कसा बनला आहे याबाबतचे गांभीर्य १४ ते २२ आठवड्याच्या विश्वासार्ह गरोदर महिलेला समजावून सांगणे महत्वाचे आहे. यानंतर सापळा रचण्याच्या प्रक्रियेत तिला सक्रीय सहभागी करावे. साधारणपणे या कामी शासकीय यंत्रणेतील नर्स, आशा कार्यकर्ती, शिक्षिका यांपैकी निवड करावी.

२. या महिलेच्या नातेवाईकांची (नवरा, सासू, आई) संमती घ्यावी. त्यांचेही याबाबत समुपदेशन करावे.

३. सदर महिला सापळा रचण्यासाठी तयार असल्याबाबतचे ‘ॲफिडेव्हीट’ घ्यावे. ॲफिडेव्हीटमध्ये सापळा (डिकॉय) कामी वापरण्यात येणाऱ्या नोटांचे नंबर नोंदवावेत व त्या नोटा गरोदर महिला किंवा साक्षीदार यांच्या ताब्यात द्याव्यात.

४. सदर महिलेसोबत पाठविण्यासाठी दोन साक्षीदार तयार करावेत.

५. शक्य असल्यास ऑडीओ, व्हिडीओ यंत्रणा तयार ठेवावी. याबाबतचे ऑपरेटिंग वगैरे तांत्रिक माहिती देऊन गरोदर महिलेला व साक्षीदाराला त्या नीट हाताळता येत आहेत का हे आधी पहावे. याबाबत ऐनवेळी गोंधळ उडणार नाही यासाठी सराव करून घ्यावा. अशी दक्षता घेणे गरजेचे ठरते.

६. सापळा रचण्यासाठी प्रमुख तीन साक्षीदार व इतर दोन निरीक्षक तयार करावेत. टीम म्हणून त्यांच्यामध्ये मित्रत्व असणे आवश्यक आहे. त्यांचे एकमेकांशी वागणे, इतर हावभाव यामध्ये सहजपणा असावा. एकूणच त्यांचा एकमेकांमधील संवाद हा एकाच कुटुंबातील व्यक्तींसारखा असणे आवश्यक ठरते. या प्रक्रियेतील टीमचे गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याबाबतचे प्रशिक्षण घेतले जावे.

७. संबंधित समुचित प्राधिकारी यांनी ज्या ठिकाणी सापळा रचला जाणार आहे त्या सोनोग्राफी सेंटरच्या किंवा हॉस्पिटलच्या जवळच उपलब्ध राहावे.

८. ऐनवेळी गरज पडल्यास जवळच्या पोलीस ठाण्याचे संपर्क क्रमांक उपलब्ध असावेत. तेथील अधिकाऱ्यांशी तातडीने समन्वय साधला जाऊ शकेल याची दखल घ्यावी.


९. रचलेला सापळा यशस्वी झाल्याचे कळताच संबंधित समुचित प्राधिकारी यांनी आरोपीस स्वतःच्या ताब्यात घ्यावे. आरोपीचे फोन बंद करावेत. त्याला/तिला इतर कुणाशी संपर्क साधता येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. आरोपीची तसेच सहआरोपींचीही (इतर पॅरा मेडिकल स्टाफ, एजंट, पी. आर. ओ.) चौकशी पूर्ण करून जबाब घ्यावेत.

१०. संबंधित सोनोग्राफी सेंटरची/हॉस्पिटलची संपूर्ण तपासणी (इन्स्पेक्शन) करून महत्वाची संबंधित सर्व कागदपत्रे ताब्यात घ्यावीत. नियमानुसार जप्ती प्रक्रिया पूर्ण करून सील करावी. संबंधित संपूर्ण इमारत, घर, गॅरेज, हॉस्पिटल सर्व तपासावे. नोंदणी न केलेले एखादे मशीन असण्याची शक्यता असते. तसेच तपासणी दरम्यान संशयास्पद पेशंट, नातेवाईक आढळल्यास त्यांचेही जबाब, नाव, पत्ता संपर्कासह नोंदवावेत. आवश्यकता वाटल्यास त्यांना चौकशीसाठी बोलावता येते. याबाबतचा तपासणी (इन्स्पेक्शन) अहवाल पूर्ण करावा.

११. पंचनामा करून चौकशी पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर वकिलांशी सल्ला मसलत करून खटला बनवून कोर्टात दाखल करावा.

१२. ऑडीओ आणि व्हिडीओ रेकॉर्डिंग झाले असल्यास त्यामध्ये कसलाही बदल न करता सीडी बनवून कोर्टाच्या ताब्यात द्यावी आणि ते सर्व संभाषण कागदावर लिहून ते खटल्याबरोबर जोडावे.

१३. समुचित प्राधिकारीच तक्रारदार असल्याने कोर्टाने नेमलेल्या तारखेस कामकाजासाठी स्वतः किंवा प्रतिनिधीने उपस्थित राहावे.




**डिकॉय करताना या गोष्टींचा योग्य वापर करता येतो आणि पुरावा म्हणून कोर्टाच्या स्वाधीन करता येतात.**

# आणि असा करावा पंचनामा!

पंचनामा कसा करावा याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना राज्य कुटुंब कल्याण कार्यालयातून परिपत्रक पाठवण्यात आले आहेच. या अंकातूनही आपण अधिक समजून घेऊयात!

सोनोग्राफी मशीन, कागदपत्रे, इतर पुरावे दोन स्वतंत्र आणि खात्रीशीर पंचांच्या उपस्थितीत ताब्यात घ्यावे लागते. पंचनामा हा या दोन पंचांसमोर केला जातो. हा पंचनामा करताना काही बाबी लक्षात घेणं महत्वाचं आहे.

१. नोटा शोधून नंबरप्रमाणे आहेत का याची खात्री करून पंचनामा करावा व ताब्यात घ्याव्यात.

२. तपासणी दरम्यान सोनोग्राफी मशीन अधिकृत किंवा अनधिकृत सील करून ताब्यात घ्यावीत. सोनोग्राफी मशीनची संख्या कंपनीचे नाव मॉडेल नंबर नोंदणी प्रमाणपत्र इतर माहिती या सर्व गोष्टीचा पंचनामा पूर्ण केला जातो.

३. त्याच ठिकाणी साक्षीदार, गरोदर महिला यांचे जबाब घेऊन त्यांच्याकडील पुरावे, ऑडीओ आणि व्हिडीओ कॅसेट इत्यादी ताब्यात घ्यावे. गरोदर महिला व साक्षीदारांना त्यांच्या जबाबाची प्रत व कॅसेटची कॉपी द्यावी.

४. पत्रकारांना त्याच ठिकाणी घडलेल्या घटनेची माहिती द्यावी. सर्व तपासणी दरम्यान व्हिडीओ कॅमेरा चालू ठेवावा.

५. एफ फॉर्म चे रजिस्टर किंवा केवळ एफ फॉर्म्स संबंधित पेशंटच्या माहितीसह,पंचनामा करून ताब्यात घेतले जातात. यामध्ये एकूण एफ फॉर्म्सची संख्याही नोंद करावी.

६. तसेच नोंदणी प्रमाणपत्र (मूळ प्रत व झेरॉक्स), गरोदर महिलेचे शपथपत्र, डॉक्टरांचे घोषणापत्र, ओ. पी. डी. रजिस्टर, जन्म रजिस्टर, कायद्याच्या पुस्तकाची प्रत, रेफरल स्लिप्स, नोंदणीशी संबंधित कागदपत्रे, सोनोग्राफी मशीनशी संबंधित सर्व कागदपत्रे ताब्यात घ्यावीत. समुचित प्राधिकारी यांच्याशी झालेला सर्व पत्रव्यवहार ताब्यात घेतला जातो.

७. संबंधित आरोपीस मशीन आणि कागदपत्रे चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची पोहोच तारीख, वेळ, ठिकाण यांचा उल्लेख करून दिली जाते.

८. पंचनाम्यावर दोन्ही पंचांची तसेच आरोपीचीही स्वाक्षरी घेतली जाते.

# गुन्हा दाखल कसा करावा?

- नियमांप्रमाणे तपास आणि जप्ती प्रक्रिया पूर्ण करावी.
- सर्व पंचनामे व्यवस्थित लिहिले आहेत याची खात्री करावी. पंचनाम्याचा नमुना पंचनाम्याशी संबंधित फौजदारी दंड संहितेप्रमाणे आहे का हे जाणीवपूर्वक पाहावे.
- पंच खात्रीशीर असावेत. त्यांना कायद्याबद्दल माहिती देऊन आणि विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देऊनच त्यांची पंच म्हणून निवड केलेली असावी.
- संबंधित आरोपीस त्वरित जप्ती केलेल्या सर्व साहित्याची पोहोच देऊन त्यावर आरोपीची सही घ्यावी.
- सोनोग्राफी केंद्राची नोंदणी निलंबित केल्याचे पत्र त्वरित द्यावे. संबंधित आरोपी, त्याला/तिला मदत करणारे सहआरोपी या सर्वांचे जबाब घ्यावेत.
- डिकॉय महिला, साक्षीदार यांचे जबाबही त्याठिकाणीच पूर्ण करावेत.
- डिकॉय महिला व साक्षीदारांचे त्या खटल्याशी किंवा स्टिंग ऑपरेशनशी संबंधित लेखी पुरावे (केस पेपर, रिपोर्ट), तांत्रिक पुरावे (ऑडीओ सी. डी., व्हिडीओ सी. डी.) इत्यादीच्या मूळ प्रती ताब्यात घ्याव्यात.
- खटल्याशी संबंधित इतर डॉक्टर, एजंट, हॉस्पिटल, सोनोग्राफी मशिनचे मालक, डीलर यांची तपासणी, साक्ष महत्वाची वाटल्यास नोटीस देऊन किंवासंबंधित हॉस्पिटल, सोनोग्राफी केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन तपास घ्यावा. आवश्यकता वाटल्यास त्यांचेही जबाब नोंदवावेत. त्या त्या ठिकाणीही तपास आणि जप्तीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण

**गर्भलिंग निदान करणे गुन्हा आहे. गुन्ह्यात सहभागी होऊ नका.**

करावी.

- संबंधित हॉस्पिटल/सोनोग्राफी केंद्राला भेट दिल्याचा व्हिजीट रिपोर्ट आणि इन्स्पेक्शन रिपोर्टही लिहावा.
- शक्य झाल्यास वृत्तपत्रांना त्वरित घडलेल्या प्रकाराची माहिती द्यावी.
- सर्व शोध, तपास, जप्ती, जबाब, पंचनामे पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर तपशिलासहित त्यावर तक्रार अर्ज तयार करावा.
- तातडीने सल्लागार समितीची बैठक बोलावून झालेल्या प्रकाराची माहिती समितीला द्यावी आणि गुन्हा दाखल करण्याबाबत ठराव घ्यावा. कायद्यातील कलम २० मधील उपकलम ३ अन्वये सदर सोनोग्राफी केंद्राची नोंदणी रद्द केल्याचाही ठराव घ्यावा.
- नोटिफिकेशन/राजपत्र तक्रार अर्जासोबत मूळ प्रतीत न्यायालयात दाखल करावे.
- मशिनसह जप्त केलेल्या साहित्यासंदर्भात स्वतंत्र अर्ज करून सर्व साहित्य कोर्टाच्या ताब्यात द्यावे.
- नोंदणी रद्द केल्याचे पत्र, पंचनामे, जबाब, अर्ज, मूळ तक्रार अर्ज, सर्व जप्त केलेली कागदपत्रे, इतर साहित्य सरकारी वकिलांना द्यावे.
- ही सर्व कायदेशीर प्रक्रिया सल्लागार समितीमधील कायदा तज्ञ/सहाय्यक सरकारी वकील/जिल्हा सरकारी वकील/विशेष सरकारी वकील यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाने पूर्ण केली जावी.
- खटला दाखल करून केस नंबर घ्यावा. खटला थेट प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात समुचित प्राधिकारी यांनीच तक्रारदार या नात्याने दाखल करावयाचा आहे.
- हा अजामीनपात्र गुन्हा असल्याने समुचित प्राधिकारी यांनी गुन्हा दाखल करून संबंधित वकिलांना गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात आणून देऊन जामिनास विरोध करावा. सोनोग्राफी मशीन ताब्यातून सुटणार नाही याची काळजी घ्यावी. स्वतःच्या किंवा सल्लागार समितीच्या सल्ल्याने मशीन सोडून देऊ नये.
- संपूर्ण प्रक्रियेदरम्यान हे प्रकरण खाजगी फौजदारी गुन्हा म्हणून हाताळले जाते याची नोंद घ्यावी.
- न्यायालयीन सुनावणीच्या प्रत्येक तारखेला समुचित प्राधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असावेत. सर्व साक्षी, पुरावे कोर्टात हजर करून ते नीटपणे मांडले जातील याकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवणे ही समुचित प्राधिकारी यांची जबाबदारी आहे.
- खटल्याशी संबंधित सर्व मुद्दे, जबाब, पंचनामे याच्या मूळ प्रती खटल्याचा भाग म्हणून कोर्टात दाखल करणे बंधनकारक आहे. या प्रती कोर्टात दाखल न करणे, अर्धवट कागदपत्रेदाखल करणे किंवा झेरॉक्स प्रती दाखल करणे योग्य नाही. असे झाल्यास आरोपीस मदत केल्याची तक्रार होऊ शकते. विषयाचे, गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकरण हाताळले जावे. अन्यथा साक्षीदार तसेच कोर्टाने गंभीर नोंद घेतल्यास समुचित प्राधिकारी अडचणीत येऊ शकतात.
- शक्यतो डिकॉय महिला, साक्षीदार यांचे मूळ पत्ते गोपनीय राहतील याची दक्षता घेतली जावी. जेणेकरून त्यांच्यावर आरोपी दबाव आणून किंवा आमिष दाखवून त्यांना फितूर करणार नाहीत.
- संपूर्ण प्रक्रियेदरम्यान आवश्यकता भासल्यास पोलीस संरक्षण किंवा त्या त्या वेळी मदत घ्यावी. अर्ज करून समुचित प्राधिकारी ही मदत पूर्व नियोजित किंवा तातडीनेही मागवू शकतात.
- अशा खटल्यांसाठीचा सर्व खर्च पीसीपीएनडीटी खात्यावरील जमा रक्कमेतून करावा. (खर्चापूर्वी किंवा खर्चानंतर सल्लागार समितीची मंजूरी घ्यावी. त्यासंदर्भातील ठराव पास करून घ्यावा.)
- 'गुन्हा निश्चितीकरण' (Charge Frame) झाल्यावर लगेच साक्षांकित प्रत घेऊन आरोपीची डॉक्टर म्हणून असणारी नोंदणी, निलंबनाचा अर्ज राज्य वैद्यकीय परिषदेकडे (State Medical Council) करावा.
- दाखल केलेला गुन्हा उपलब्ध केलेल्या साक्षी, पुराव्यांसह आणि कायद्याचे उल्लंघन केलेल्या सर्व नियम व कलमांसह निश्चित झाल्याची खात्री करून घ्यावी. तसे झाले नसल्यास 'चार्ज फ्रेम अल्टरेशनचा' अर्ज करून योग्य ते बदल करण्यास विनंती करावी.

**सोनोग्राफी कशासाठी? गरोदरपणातील रोगनिदानासाठी!**
**गर्भ मुलीचा का मुलाचा हे तपासाल, तर तुरुंगाची हवा खाल.**

# वैद्यकीय गर्भपात कायद्यातील बारकावे : एक दृष्टीक्षेप

१९७१ साली भारतामध्ये वैद्यकीय गर्भपात कायदा लागू करण्यात आला. कायद्याची अंमलबजावणी सुधारावी आणि स्त्रियांना, विशेषकरून खाजगी दवाखान्यांमध्ये गर्भपाताची सुविधा सहजपणे मिळावी यासाठी २००३ साली या कायद्यात सुधारणा करण्यात आली. तरी आजही असुरक्षित गर्भपात मोठ्या प्रमाणावर होत आहेत. सुरक्षित गर्भपाताची सेवा स्त्रियांना मिळावी आणि झालेल्या गर्भपाताबाबत पूर्णपणे गुप्तता राखली जावी ही सर्व खाजगी आणि सरकारी दवाखान्यांची जबाबदारी आहे.

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मधील तरतुदींमध्ये कलम ४ नुसार सदर कायद्यांतर्गत मान्यताप्राप्त झालेल्या सर्व सरकारी दवाखान्यांना तसेचकलम ४(ब) नुसार शासनमान्यताप्राप्त खाजगी दवाखान्यांना गर्भपाताची सेवा पुरवण्यास परवानगी दिलेली आहे. २००३ साली झालेल्या सुधारित कायदा कलम ४(ब) नुसार जिल्हा समितीद्वारा खाजगी दवाखान्यांनाही मान्यता देण्याची तरतूद आहे. १९७१ च्या कायद्यानुसार सर्जिकल गर्भपात करण्यास मान्यता होती. २००३ साली केलेल्या सुधारणांमध्ये मेडिकल (औषध, गोळ्या वापरून) गर्भपात करण्यास मान्यता देण्यात आली. संबंधित दवाखान्यांमध्ये केले जाणारे गर्भपात हे सुरक्षितपणे आणि काळजीपूर्वक केले जातात अशी खात्री शासनाला पटल्यानंतरच ही मान्यता दिली जाते. कारण आवश्यक सेवा-सुविधांची, साधनांची उपलब्धता आणि वेळेवर पूर्तता होणे गरजेचे असते.

वैद्यकीय गर्भपात कायद्यांतर्गत खाली दिलेल्या माहितीप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे संबंधित केंद्राला / विभागाला बंधनकारक असते. या कायद्यांतर्गत तीन प्रकारच्या नोंदी केल्या जातात. कायद्याची अंमलबजावणी काटेकोर व्हावी यासाठी या नोंदी महत्वाच्या ठरतात.

**फॉर्म सी :** संबंधित महिलेचे गर्भपात करण्यासाठीचे संमती पत्र घेतले जाते.

**फॉर्म एक :** वैद्यकीय गर्भपाताची सेवा देणाऱ्या नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सकाचे (डॉक्टरांचे) (Registered Medical Practitioner) मत नोंदवले जाते. १२ आठवड्यानंतरच्या गर्भपातासाठी या फॉर्ममध्ये दोन किंवा अधिक चिकित्सकांचे मत नोंदवता येते. मात्र हा फॉर्म कायद्यानुसार गर्भपात केल्यापासून तीन तासांच्या आत भरणे संबंधित चिकित्सकास बंधनकारक आहे. वैद्यकीय गर्भपात करणारे नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सक (एक किंवा जास्त) यांनी त्यांनी नोंदवलेले मत (फॉर्म - १) व संबंधित महिलेचे गर्भपात करण्यासंबंधीचे संमती पत्र (फॉर्म सी); हे एकत्रितपणे सील बंद लिफाफ्यात सुरक्षितपणे संबंधित गर्भपात केंद्राच्या मालकाच्या स्वाधीन करणे बंधनकारक असते. अशा लिफाफ्यावर गर्भपात केलेल्या महिलेचे नाव न लिहिता ॲडमिशन रजिस्टरमधील संबंधित महिलेचा अनुक्रमांक, गर्भपात करणाऱ्या नोंदणीकृत डॉक्टरांचे नाव लिहावे. या लिफाफ्यावर 'गोपनीय' असे लिहिणे बंधनकारक आहे.

**फॉर्म दोन :** या फॉर्ममध्ये गर्भपात केंद्रात झालेल्या सर्व गर्भपातांची माहिती एकत्रित करून दरमहा जिल्हा शल्यचिकित्सक/आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांना पाठवणे बंधनकारक आहे.


**फॉर्म तीन :** सदर कायद्याच्या कलम ५ अन्वये ॲडमिशन रजिस्टरमध्ये संबंधित महिलेचे नाव, वय, पत्ता, भरती दिनांक, गर्भ कालावधी, गर्भपात करण्यामागील कारणे, इतर सर्व तपशील नोंद केले जातात. या रजिस्टरमध्ये एकूण १४ रकाने असतात. हे अत्यंत महत्वाचे गोपनीय रजिस्टर असून प्राधिकृत अधिकाऱ्याशिवाय इतर कुणालाही दाखवता येत नाही.

गर्भपात करण्यासाठी संबंधित महिलेची संमती पुरेशी आहे. जोडीदाराच्या संमतीची आवश्यकता नसते. फक्त अल्पवयीन (१८ वर्षाखालील) आणि मतिमंदत्व/मानसिक आजार असणाऱ्या मुली किंवा स्त्रियांच्या बाबतीत त्यांच्या पालकांची संमती घेतली जाते. वैद्यकीय गर्भपात कायद्यांतर्गत गर्भपाताच्या सर्व प्रकरणाबद्दल काटेकोरपणे गुप्तता पाळणे बंधनकारक आहे.

ॲडमिशन रजिस्टर (फॉर्म ३) शिवाय इतर कुठलेही रजिस्टर, ऑपरेशन थिएटर, नर्सेस रजिस्टर, केसशीट, फॉलोअप कार्ड किंवा गर्भपात केलेल्या महिलेचे नाव किंवा गर्भपाताबाबतचा इतर तपशील अन्य ठिकाणी लिहिता कामा नये. त्याऐवजी ॲडमिशन अनुक्रमांक नमूद करावा. कायद्यानुसार सर्व रजिस्टर रेकॉर्ड किमान ५ वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवणे बंधनकारक आहे.

तसेच एखाद्या नोकरदार गर्भवती महिलेने गर्भपाताच्या कालावधीत रजा मंजुरीसाठी प्रमाणपत्राची मागणी केल्यास तिच्या नोकरीच्या ठिकाणावरील मालकाकडून गोपनीयता ठेवण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेऊन प्रमाणपत्र देता येईल.

गर्भपात रेग्युलेशन कलम ४(६) नुसार एखादा गर्भपात मूळ कायद्यातील कलम ५ मधील तरतुदीनुसार केला गेला असल्यास गर्भपात करणाऱ्या नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सकाने मत नोंदणी फॉर्म (फॉर्म १) मधील हॉस्पिटल तसेच ॲडमिशन रजिस्टरमधील अनुक्रमांक याबाबतचा रकाना तसाच कोरा ठेवून फॉर्म १ तसेच फॉर्म सी (संमतीपत्र) हे सील बंद लिफाफ्यात 'गोपनीय' असा शेरा




आमच्या शरीरावर आमचा हक्क मेहर

लिहून गर्भपात करणाऱ्या नोंदणीकृत डॉक्टरांचे नाव, संपूर्ण पत्ता तसेच गर्भपाताचा दिनांक लिहावा. हा लिफाफा गर्भपात केंद्राच्या मालकाच्या सुपूर्द करावा. गर्भपात रेग्युलेशन कलम ४ (७) नुसार एखादा गर्भपात नोंदणीकृत गर्भपात केंद्रात/रुग्णालयात गर्भपात मूळ कायदा कलम (५) च्या तरतुदीनुसार केला गेला असल्यास त्याबद्दलची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक/महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी यांस रजिस्टर पोस्टाद्वारा त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी तरी पाठवणे बंधनकारक आहे.

**या अंकासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भपुस्तिका :**


१. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा (समुचित प्राधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षण पुस्तिका) : लेक लाडकी अभियान निर्मित

२. राज्य कुटुंब कल्याण विभाग आणि राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र यांकडून मिळालेली माहिती

३. पोस्टर इमेज – तथापि प्रकाशन, २०११


नुकतीच सुप्रीम कोर्टात वैद्यकीय गर्भपात कायद्यात सुधारणा करण्याच्या हेतूने एक याचिका दाखल झालेली आहे. या याचिकेची दखल घेऊन आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने काही शिफारशी केलेल्या आहेत. सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताची सेवा मिळणं हा स्त्रियांचा हक्क आहे. कायदेशीर गर्भपाताच्या सेवेची उपलब्धतता आणि सुरक्षितता वाढावी अर्थात कायदा सशक्त व्हावा या उद्देशांच्या पातळीवर वैद्यकीय गर्भपाताचा कायदा सुधारणेच्या प्रक्रियेत आहे.

## कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समुचित प्राधिकाऱ्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाविषयी माहिती:

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याविषयी तसेचया कायद्यांतर्गत समुचित प्राधिकाऱ्यांची कामे, अधिकार व जबाबदाऱ्या याबद्दल त्यांना माहिती मिळावी या उद्देशाने संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांच्या सहाय्याने राज्यात प्रशिक्षणे घेण्यात आली. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या जिल्हा किंवा उपजिल्हा पातळीवर नेमणूक असलेल्या समुचित प्राधिकाऱ्यांचे प्रशिक्षण गटनिहाय विभागणी करून घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये राज्यात ठिकठिकाणी चालू असलेल्या गर्भलिंग निदान करणाऱ्या सोनोग्राफी केंद्रांना आळा घालणे आणि संबंधितांवर कायदेशीररीत्या कारवाई करणे यावर भर देण्यात आला. या कायद्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी ‘माहिती, शिक्षण आणि संवाद’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती केली जाते.


### ऋणनिर्देश :

‘सदाफुली’चा तिसरा अंक प्रसिद्ध करण्यास मा. श्रीमती आय. ए. कुंदन, आयुक्त (कुटूंब कल्याण) तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई आणि डॉ. सतिश पवार संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदरचा अंक प्रसिद्ध करण्यात संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांचे सहाय्य मिळाले. या अंकाचे लेखन व संपादन तथापि ट्रस्ट, पुणे यांनी केले आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

**डॉ. उध्दव गावंडे**
कार्यकारी संचालक,
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र राज्य, पुणे